- छत (Rooftop) असलेल्या आस्थापना मालकांची एअर म्युझिकमुळे संबंधित इमारतीतील रहीवाशांना त्रास होत नाही याची खातरजमा करण्याची जबाबदारी असेल. ध्वनी प्रदूषण (नियम आणि नियंत्रण) नियम, 2000 संबंधित तरतुदींचे पालन केले जात नसल्याचे निदर्शनास आल्यास नमूद नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पीकरसाठी मर्यादा साधारणपणे रात्री 10.00 अशी आहे.
- सर्व आस्थापनांनी "NO DRUGS ALLOWED / DRUG CONSUMPTION IS BANNED असे आस्थापनेच्या दर्शनी भागांवर फलक लावावेत. आस्थापनांकडून मादक पदार्थाचे सेवन केले जात नाही याची खात्री करण्यासाठी कसून तपासणी केली जाईल.
- उत्पादन शुल्क परवानगीच्या अटींसंदर्भात शासनाने जारी केलेल्या सर्व प्रचलित नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल.
- वैध अबकारी परवाना नसलेले कोणतेही खाद्यगृह / ढाबा / आस्थापना त्यांच्या ग्राहकांना दारु पिण्यास किंवा विक्री करण्यास परवानगी देऊ शकत नाहीत.
- अशा आस्थापनांचे मालक विशिष्ट कार्यक्रम आयोजित करण्यासाठी किंवा त्यांचा परिसर व्यवस्थापित करण्यासाठी बाह्य एजन्सी किंवा व्यवस्थापकांना नियुक्त करतात अशावेळी. वर नमूद केलेल्या सर्व मुद्यांच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी आणि उत्तरदायित्व अशा आस्थापनांच्या मालकांवर अवलंबून असेल.
- आस्थापनांतील व्यवस्थापक यांनी कोणताही गोंधळ किंवा अनुचित घटनेची माहिती स्थानिक पोलीस ठाणे / वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहचविणे तसेच अशी माहिती त्वरित पोलीस नियंत्रण कक्षाच्या डायल क्र.112 वर कळविणे अपेक्षित आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती प्रत्येक प्रकरणाच्या आधारावर भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 सह इतर संबंधित कायद्यातील कलमानुसार गुन्हेगारा अपराधास पात्र राहील. असे असले तरी बार मालकांकडून वरील पैकी काहीच नियम पाळले जात नाहीत. भविष्यात हिट अँड रन सारखी एखादी दुर्दवी घटना घडण्याअगोदर पोलीस काय कारवाई करतील ? असा प्रश्न सर्व सामान्य नागरिकांना पडला आहे.

'वर्षा' निवासस्थानी श्री गणरायाची प्रतिष्ठापना

"राज्यातील जनतेला सुख, समृद्धी मिळू दे" मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गणरायाला साकडे

मुंबई (वाशी समाचार)

गणेशोत्सवानिमित्त दि. ७ सप्टेंबर रोजी 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्नीक श्री गणरायाची विधिवत पूजा करुन प्रतिष्ठापना केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी "राज्यातील जनतेला सुख समृद्धी मिळू दे" अशी प्रार्थना केली दरवर्षीप्रमाणे यंदाही मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी गणरायाचे आगमन झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी सौ. लता शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, स्नुषा सौ. वृषाली शिंदे, नातू कु. रुद्रांश यावेळी उपस्थित होते

यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की, गणरायाचं आगमन झालंय. आपल्या आयुष्यात पण आनंद, समाधान, समृद्धी येवो, सर्वांना सुबुद्धी मिळो हीच प्रार्थना. प्रत्येक गणोशोत्सव एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येतो. सगळीकडे मंगलमय आणि पवित्र वातावरण निर्माण होतं. गणेशोत्सवातून

महाराष्ट्राच्या महान संस्कृतीचं दर्शन घडतं. सगळ्या जगाचं महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. या काळात महाराष्ट्राच्याच नाही तर देशात आणि विदेशातही मराठी माणसांत उत्साह-जोश दिसतो. हे शेतकऱ्यांचे, कष्टकऱ्यांचे सरकार आहे. यंदा राज्यात सगळीकडे खूप चांगला पाऊसही झाला आहे, त्यामुळं शेतकरी बांधवामध्येही उत्साह आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतीभातीचं नुकसान झालं आहे. पण सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, बरोबर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सगळी मदत केली जाईल.

माझं आपणास आवाहन आहे. की, श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकची जाणीव ठेवूया. गरजू लोकांपर्यंत पोहचा. त्यांना मदतीचा हात द्या. त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य तसेच अशा विविध प्रकारच्या सेवा, मदत पोहचवण्याचा प्रय़त्न करूया.

आपण पर्यावरणाची काळजी घेणं पण गरजेचं आहे. आपले सणवार हे निसर्गाला पूरक असे असतात. त्यामुळे निसर्गाचं जतन-संवर्धन होईल ही बाब लक्षात घेऊन सण साजरे करावेत असेही आवाहन यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले.

संपादकीय

राणीचे राज्य

महिला मतदारांची ताकद दिसूनही यंदाच्या निवडणुकीत, स्त्रियांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे दर्शन जेमतेम १४ टक्के एवढेच झाले. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत सगळ्यांचे लक्ष बारामती मतदारसंघातील 'नणंद-भावजयी'च्या लढतीवर लागले होते. एरवी सर्वसामान्य कुटुंबातही हे नाते तसे 'राजकीय'च असते. ते प्रत्यक्ष निवडणुकीच्या आखाड्यात आल्यावर त्याचा 'टीआरपी' वाढणार हे उघड होते. त्यात कुणाचा तरी विजय आणि कुणाचा तरी पराजय, हेही ठरलेलेच. पण पराभूत झालेल्या सुनेत्रा पवार खासदार होऊन मागच्या दाराने तातडीने राज्यसभेत पोहोचल्या हेदेखील अगदी भारतीय राजकारणातील स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाचे नेमके प्रतिबिंब दाखवणारे ठरले. 'कुणाचे तरी कुणी तरी' म्हणजे कुणाची मुलगी, बहीण, बायको असल्याशिवाय स्त्रियांना राजकीय क्षेत्रातील दरवाजे इतके सताड आणि सहज उघडत नाहीत, हे आपले पिढ्यानपिढ्यांचे राजकीय वास्तव. प्रत्येक निवडणुकीत ते अधोरेखित होत जाते. २०२४ ची लोकसभा निवडणूक अनेक अर्थांनी वेगळी ठरली असली तरी तिने स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाबाबतचे कोणतेही 'फंडे' बदलले नाहीत. ना कोणत्याही पक्षाने एरवीपेक्षा जास्त प्रमाणात स्त्रियांना उमेदवारी दिली, ना स्त्री प्रतिनिधींची लोकसभेमधली टक्केवारी वाढली. नाही म्हणायला मतदान करायला बाहेर पडलेल्या स्त्रियांचे प्रमाण वाढले, पण निवडून आलेल्या स्त्रियांचे प्रमाण मात्र गेल्या लोकसभेपेक्षा थोडेफार कमीच झाले.

दर निवडणुकीत अशी टक्केवारी थोडीफार मागेपुढे होणारच असे जर कुणाला वाटत असेल तर त्यांना 'पर्सनल इज पोलिटिकल' ही म्हण माहीत नाही, असेच म्हणावे लागेल. या जगात जन्मलेल्या अगदी प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी आपले स्वत:चे हितसंबंध महत्त्वाचे वाटणे, ते पुढे रेटण्यासाठी त्याने प्रयत्न करणे योग्य असेल तर भारतासारख्या जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशात स्त्रियांचा सत्तेतील सहभाग इतका नगण्य कसा असू शकतो? सत्तेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे, ती मिळवणे आणि ती मिळाल्यावर आपल्याला योग्य वाटतात त्या हितसंबंधांसाठी ती राबवणे हेच लोकशाही प्रक्रियेत अभिप्रेत असताना या माध्यमातून आपले म्हणजे समस्त स्त्रियांचे हितसंबंध पुढे रेटावेत, हे फारशा स्त्रियांनाच वाटत नाही, असे का? त्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा नसतेच का?

यंदाच्या निवडणुकीत तर स्त्रियांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचे दर्शन जेमतेम १४ टक्के एवढेच झाले आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार या वेळेला ५४३ मतदारसंघांसाठी एकूण आठ हजार ३६० उमेदवार लोकसभेसाठी उभे राहिले, त्यामध्ये ७९७ स्त्रिया होत्या. आणि त्यापैकी ७४ जणी म्हणजे साधारण १३.६ टक्के स्त्रिया खासदार म्हणून निवडून आल्या. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत हेच निवडून येण्याचे प्रमाण १४ टक्के होते. तेव्हा ७२६ जणी निवडणुकीसाठी उभ्या राहिल्या होत्या आणि त्यापैकी ७८ जणी निवडून आल्या होत्या. या वेळी निवडून आलेल्या स्त्रियांपैकी ४३ जणी पहिल्यांदा खासदार झाल्या आहेत. तर लालू यादव कन्या मिसाभारती पहिल्यांदाच निवडून आल्या आहेत. लोकसभेचे वय सरासरी ५६ वर्षे आहे तर स्त्री खासदारांचे वय सरासरी ५० वर्षे आहे. या ७४ जणींमध्ये भाजपच्या खासदार ३१, काँग्रेसच्या १४, तृणमूल काँग्रेसच्या ११, इतर म्हणजेच झामुमो, राष्ट्रवादी (शरद पवार गट), अपना दल, राजद, तेलुगु देसम वगैरे मिळून सात, समाजवादी पक्षाच्या पाच, द्रमुक तीन, संयुक्त जनता दल दोन आणि लोकजनशक्ती-पासवान पक्षाच्या दोघी निवडून आल्या आहेत.

विशेष म्हणजे स्त्री मतदारांचे प्रमाण मात्र या वेळी गेल्या म्हणजे २०१९च्या निवडणुकीच्या तुलनेत वाढले आहे. २०१९ च्या निवडणुकीत एकूण स्त्रियांपैकी ६७.४० टक्के स्त्रिया मतदानासाठी बाहेर पडल्या होत्या. तर २०२४ मध्ये हेच प्रमाण ६५.७९ एवढे होते. या वेळच्या निवडणुकीत एकूण ६४.२ कोटी जणांनी मतदान केले, त्यात स्त्रियांचे प्रमाण जवळपास निम्मे म्हणजे तब्बल ३१.२ कोटी होते. म्हणजे निवडणुकीत मतदान करून आपल्याला योग्य वाटतो तो लोकप्रतिनिधी निवडून आणण्याचे महत्त्व त्यांना माहीत आहे. राजकीय पक्षांच्या दृष्टीनेही स्त्री मतदारांचे प्रमाण महत्त्वाचे असल्यामुळे वेगवेगळ्या पक्षांच्या जाहीरनाम्यांमधूनही त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले जाते. भाजपच्या जाहीरनाम्यामधून बचत गटाच्या माध्यमातून 'लखपती दीदीं'चे प्रमाण वाढवणार असल्याचे सांगितले गेले होते. पक्षाकडून २०१४ मध्ये 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' त्यानंतर 'नमो ड्रोन दीदी'सारख्या योजना जाहीर केल्या गेल्या होत्या. महिला आरक्षण विधेयक, ट्रिपल तलाक रद्द या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांवर भर दिला होता. काँग्रेसनेही दरमहा खात्यात ८,५०० रुपये 'खटाखट' जमा होऊन सर्व गरीब स्त्रियांना लखपती करणार असल्याचे जाहीर केले होते. आरक्षण विधेयक तातडीने लागू करणार, स्त्रियांना सरकारी नोकरीत ५० टक्के आरक्षण देणार असेही काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील मुद्दे होते. पण मतदार म्हणून स्त्रियांना महत्त्व देणारे हेच राजकीय पक्ष स्त्रियांना उमेदवारी देण्याची वेळ आली की मात्र हात आखडता घेतात. राजकीय नेत्यांना ओवाळायला, पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये व्यासपीठावर हारतुरे आणून द्यायला, पक्षाच्या आंदोलनांमध्ये घोषणा द्यायला स्त्री कार्यकर्त्या आणि निवडणुका लढवायला राजकीय घराण्यांमधल्या लेकीसुना हे चित्र बदलताना दिसत नाही.

'चतुरंग'चा भरगच्च कार्यक्रम पत्रिकेचा सुवर्णमहोत्सवी आनंदसोहळा !

मुंबई (वाशी समाचार)

प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात आपल्या जीवनगौरव पुरस्कारासाठी होणाऱ्या 'रंगसंमेलना' व्यतिरिक्त यावर्षी 'चतुरंग प्रतिष्ठान'ने आपल्या पन्नाशीच्या पूर्तते निमित्ताने मुंबईमध्ये याच सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस दोन दिवसांच्या सुवर्णमहोत्सवी आनंद सोहळ्याचे आयोजन केले आहे. १४ विद्या ६४ कलांसारख्या बहुविध क्षेत्रातील प्रतिनिधिक अशा ११ नामवंत गुणवंतांचा 'चतुरंग सुवर्णरत्न सन्माना'ने जाहीर सन्मान करताना, त्यांच्या गौरवाप्रित्यर्थ नृत्य.. नाट्य.. साहित्य.. संवाद.. गायन-वादन.. अशा कलाविष्कारांचे विशेष आयोजन केले आहे. यामध्ये नृत्यांगना शर्वरी जमेनीस यांची 'अर्घ्य' ही नृत्यवंदना आहे.. टेलिव्हिजन मालिकाविश्वात खूप लोकप्रिय झालेल्या 'हास्यजत्रा' या मालिकेतील सचिन गोस्वामी, सचिन मोटे, पृथ्विक प्रताप, रोहित माने, शिवाली परब या हास्यजत्रावीरांची, सुधीर गाडगीळांचा वारसा चालवणारे 'मित्र म्हणे' फेम सौमित्र पोटे हे 'मुलाखत' घेणार आहेत. कविवर्य कुसुमाग्रज आणि नाटककार शिरवाडकर हे जर समोरासमोर आले-भेटले तर त्यांच्यात होऊ शकणाऱ्या संवाद-गप्पांचा धनश्री लेले लिखित 'हा सूर्य... हाच चंद्र!' हा कुतूहलजन्य नाट्यप्रयोग, दिग्पाल लांजेकर यांच्या दिग्दर्शनाखाली अजय पूरकर आणि दीपक करंजीकर सादर करणार आहेत. गानप्रिय रसिकश्रोत्यांमध्ये सर्वसाधारणपणे खूप लोकप्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या गाण्यांची 'ओठांवरची आवडती गाणी' ही संगीत मैफल, सध्याचे आघाडीचे रसिकपसंत युवा गायक प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, शमिका भिडे हे सादर करणार आहेत.

चतुरंग संस्थेच्या पायाभरणीकारांना कृतज्ञ वंदन करण्याच्या समारंभात आणि लक्षवेधी, उत्तुंग कारकीर्दीच्या पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. उल्हास कशाळकर, अशोक पत्की, दिलीप प्रभावळकर, बाबासाहेब कल्याणी, मेजर महेशकुमार भुरे, डॉ.अनिल काकोडकर, महेश एलकुंचवार, वासुदेव कामत, रोहिणी हट्टंगडी, आणि चंदू बोर्डे या नामवंत, गुणवंत मान्यवरांचा 'चतुरंग सुवर्णरत्न सन्माना' ने गौरव होणाऱ्या खास समारंभात विशेष सहभागी म्हणून ॲड. उज्वल निकम, अविनाश धर्माधिकारी, देवकी पंडित, धनश्री लेले, विजय केंकरे, सुहास बहुळकर, श्रुती भावे-चितळे, स्वानंद बेदरकर, आदित्य शिंदे, समीरा गुजर आदी नामवंतांचा समावेश असणार आहे....

इतक्या बहुविध समाविष्टतेचा आणि चतुरंग पन्नाशीचा भव्योत्सवी सुवर्णानंद सोहळा शनिवार-रविवार दिनांक २८-२९ सप्टेंबर २०२४ या दोन्ही दिवशी दुपारी ४-०० ते रात्री १०-०० या वेळेत दादर-माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिरामध्ये चतुरंगने आयोजित केलेला आहे. एवढ्या मोठ्या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानने अतिशय अत्यल्प दराच्या प्रवेशिका ठेवल्या असून, निमंत्रितासाठी ठेवलेल्या राखीव जागांव्यतिरिक्तच्या प्रवेशिका शनिवार दि.२१ सप्टेंबर पासून ticketkhidakee.com वर on line booking पद्धतीने आणि थिएटरवर सकाळ-संध्याकाळ उपलब्ध होतील असे चतुरंगने आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

लायन्स क्लब तर्फे शिक्षक सन्मान

नेरुळ (वाशी समाचार)

शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील लायन्स क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आर्ट ऑफ लर्निंगच्या साहाय्याने पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील शिक्षकांचा सन्मान केला.

विद्याभवन शिक्षण संकुलाने गेल्या चोवीस वर्षात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अद्वितीय अशी कामगिरी केली असून यामागे या संकुलातील शिक्षकांसह प्रत्येक घटकाचे मोठे योगदान आहे. यासाठी आर्ट ऑफ लर्निंगच्या साहाय्याने लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्सच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले आणि शिक्षकांना 'शिक्षक रत्न' प्रमाणपत्राने सन्मानित केले. यावेळी सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. यावेळी वेदिका खोत आणि इतर विद्यार्थ्यांनी सामूहिक योगा प्रत्यक्षिके सादर केली. समाज घडवण्यात शिक्षकांचे योगदान मोठे असून त्यांचा समाजातील प्रत्येक घटक ऋणी आहे असे विचार संजीव सूर्यवंशी यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, लायन क्लब जिल्हा प्रशासक संजीव सूर्यवंशी, प्रवीण सरनाईक, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रताप मुदलीयार, लायन किर्ती सूर्यवंशी, नमिता मिश्रा, विजय गणत्रा, रीना अग्रवाल, गुंजन सलूजा, निर्मला अरोरा, हरी अरोरा, हेमंत लोणकर, राजेश जगदीश तसेच इतर पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनामध्ये 6500 रुपयांची वाढ

मुंबई (वाशी समाचार)

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना एप्रिल २०२० पासून मुळ वेतनामध्ये ६५०० रुपयांची वाढ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी घेतला. यानिर्णयाचे एसटी कर्मचारी कृती संघटनेने स्वागत करीत मुख्यमंत्र्यांचे आभार मानले. ऐन गणपती उत्सवाच्या काळात एसटी संपामुळे सामान्यांना झालेल्या त्रासाबद्दल मुख्यमंत्र्यांनी संघटनांकडे तीव्र नाराजी व्यक्त केली.

एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर दि. ४ सप्टेंबर २०२४ रोजी सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी संघटनांची बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, आमदार सर्वश्री सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, अपर मुख्य सचिव विकास खारगे, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर यांच्यासह विविध कर्मचारी संघटनांचे प्रतिनीधी उपस्थित होते.राज्य शासन एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असताना उत्सवाच्या काळात संप करून सामान्यांना वेठीस धरणे योग्य नाही असे सांगत बैठकीच्या सुरूवातीलाच मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी संपाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

संघटनांनी यावेळी केलेल्या वेतनवाढीच्या मागणीबाबत मधला मार्ग काढून एसटी कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याची भूमिका असल्याचे सांगत एप्रिल २०२० पासून कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनात ६५०० रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. त्याचबरोबर राज्यातील आगारांमध्ये चालक-वाहकांसाठी असणारी विश्रामगृहांची दुरवस्था दूर करण्यासाठी आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. चालक-वाहकांना चांगल्या सोयीसुविधा मिळायला पाहिजेत, असे सांगतानाच एसटीचा महसुल वाढीसाठी कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

एसटी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती बाबत विषयी चर्चा करताना राज्य शासनाने सर्वांसाठी महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना केली असून त्याच्याशी संलग्न योजना एसटी महामंडळाने करावी, त्याचा लाभ कर्मचाऱ्यांना होईल, अशी सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वर्षभराचा मोफत पास, निलंबित कर्मचाऱ्यांना सेवेत घेणे आदी विषयांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी कर्मचारी संघटनेचे ॲड. गुणरत्न सदावर्ते, हनुमंत ताठे, संदीप शिंदे, श्रीरंग बरगे आदींनी मनोगत व्यक्त केले. आमदार श्री. पडळकर यांनी आभार मानले.

सातव्या दिवशी 3086 बाप्पांना भावपूर्ण निरोप

नवी मुंबई (वाशी समाचार)

नवी मुंबई महानगरपालिकेने 22 नैसर्गिक व 137 कृत्रिम विसर्जनस्थळी केलेल्या सुसज्ज विसर्जन व्यवस्थेमध्ये सातव्या दिवशी 3086 श्रीगणेशमूर्तींना भाविकांनी 'पुढच्या वर्षी लवकर या' अशा गजरात भावपूर्ण निरोप दिला. विशेष म्हणजे यात 333 शाडूच्या मूर्तींचा समावेश होता. पीओपी ऐवजी शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणशील दृष्टीकोन जपणा-या गणेशभक्तांना विशेष प्रशस्तिपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे 137 इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम विसर्जन तलावात श्रीमूर्तींचे विसर्जन करणा-या 591 पर्यावरण जागरूक नागरिकांनाही कापडी पिशव्यांचे वितरण करून गौरविण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केलेल्या इकोफ्रेंडली प्लास्टिकमुक्त श्रीगणेशोत्सव' साजरा करण्याच्या आवाहनास पर्यावरण जागरूक नवी मुंबईकर नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

सर्वच विसर्जन स्थळांवर आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांसाठी विविध सोयी पुरविण्यात आलेल्या होत्या. नागरिकांना विसर्जनस्थळी निरोपाची आरती करण्यासाठी स्वतंत्र टेबलची पुरेशा संख्येने मांडणी करण्यात आलेली होती. निर्माल्य टाकण्यासाठी ओल्या व सुक्या स्वतंत्र निर्माल्य कलशाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच ते संकलित निर्माल्य वाहून नेण्यासाठी स्वतंत्र निर्माल्य वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. याशिवाय कचरामुक्तीच्या दिशेने आणखी पुढचे पाऊल उचलत मुख्य विसर्जनस्थळांवर 'फोर आर' च्या अनुषंगाने चार डबे ठेवून जागरूकता करण्यात आली.

नैसर्गिक विसर्जन स्थळांवर तराफ्यांची व्यवस्था होती तसेच आवश्यक विद्युत व्यवस्था आणि जनरेटर व्यवस्था करण्यात आली होती. नैसर्गिक विसर्जन स्थळापासून नजिकच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्याठिकाणी वैद्यकीय पथके तैनात होती व विसर्जन व्यवस्थित रितीने व्हावे

याकरिता आवश्यक संख्येने स्वयंसेवक व लाईफगार्ड्स विभाग कार्यालयांमार्फत कार्यरत होते. यासोबत नमुंमपा अग्निशमन दलाचे जवानही सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष होते. कोपरखैरणे सेक्टर-19 येथील धारण तलावात आधुनिक स्वरुपाचा यांत्रिकी तराफा बसविण्यात आला असून त्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग आकाराने मोठ्या व वजन जास्त असलेल्या गणेशमूर्तींसाठी झाला. सार्वजनिक गणेशोत्साव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी या यांत्रिकी तराफ्याच्या आधुनिक सुविधेचे कौतुक केले. कृत्रिम विसर्जन स्थळांवरही सुयोग्य व्यवस्था होती. 137 इतक्या मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या कृत्रिम तलावांबद्दल अनेक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. महानगरपालिकेने केलेल्या चोख व्यवस्थेमुळे तसेच सुसज्ज पोलीस यंत्रणेमुळे सर्व ठिकाणचे विसर्जन सुव्यवस्थित रितीने पार पडले. नमुंमपा क्षेत्रातील 22 नैसर्गिक विसर्जन स्थळांवर 2341 घरगुती तसेच 154 सार्वजनिक मंडळांच्या 2495 श्रीमूर्तींचे विसर्जन संपन्न झाले. तसेच 137 कृत्रिम विसर्जन स्थळांवर 588 घरगुती तसेच 3 सार्वजनिक मंडळांच्या 591 श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे 2495 घरगुती व 591 सार्वजनिक मंडळांच्या एकूण 3086 श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन सातव्या दिवशी सुरळीतपणे पार पडले. यामध्ये शाडूच्या 333 श्रीगणेशमूर्तींचे पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. अशाप्रकारे संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 159 विसर्जन स्थळांवर 3086 श्रीगणेशमूर्तींना भक्तीपूर्ण निरोप देण्यात आला.

लोकनेते गणेश नाईक आणि माजी आमदार संदीप नाईक हे नेहमीच कलाकारांच्या पाठीशी

नवी मुंबई (वाशी समाचार)

ऐरोली विधानसभेचे आमदार लोकनेते गणेश नाईक आणि भाजपा नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, ऐरोली विधानसभेचे प्रथम आमदार संदीप नाईक हे नेहमीच कलाकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून प्रोत्साहन देत असतात. याच अनुषंगाने भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठ, नवी मुंबई आणि गणेश नाईक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोली विधानसभेचे कार्यसम्राट आमदार लोकनेते गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष ऐरोली विधानसभेचे प्रथम आमदार संदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठ नवी मुंबई प्रभारी - सुनील पगार यांच्या माध्यमातून व नवी मुंबई सांस्कृतिक प्रकोष्ठ नवी मुंबई यांच्या संयोजनातून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरची एकपात्री अभिनय स्पर्धा ऐरोली सेक्टर ३, नवी मुंबई महानगरपालिका "जी" वॉर्ड विभागाच्या जवळील समाज कल्याण मंदिर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. हि स्पर्धा लहान गट व मोठा गट अश्या दोन गटात घेण्यात आली होती. संपूर्ण महाराष्ट्रभरातून कलाकारांनी स्पर्धेत सहभागी होऊन सामाजिक, विनोदी सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.

या राज्यस्तरीय स्पर्धेत नवी मुंबई महानगरपालिकेचे माजी जेष्ठ नगरसेवक अनंत सुतार, भाजपा नवी मुंबई माजी जिल्हाध्यक्ष दिनेश पारेख, अनिल नाकते, भाजपा कामगार मोर्चा नवी मुंबई उप अध्यक्ष - सुजीत करंजेकर, सांस्कृतिक प्रकोष्ठ कोकण विभाग सदस्य - अमेय हिंदळेकर, नवी मुंबई संयोजक सचिन पवार, सहसंयोजिका स्वाती पांचाळ, सूर्योदय प्रतिष्ठान - महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सत्यवान गायकवाड आदी मान्यवरांनी उपस्थित राहून कलाकार व कार्यक्रमाचे आयोजक सुनील पगार यांस शुभेच्छा दिल्या.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात य्येते की, **(अ) कै. बामी पोशा म्हात्रे (मयत), (ब) कै. पोशा रंगू म्हात्रे (मयत), (क) कै. निरा विठ्ठल जोशी (मयत),** (ड) कै. पिटा भुता-या त्रिगारे (मयत) यांचे वारस व उत्तराधिकारी श्रीमती. गोमुबाई सुरेश म्हात्रे, यांस प्रकल्पग्रस्त शेतकरी म्हणून महाराष्ट्रशासन व सिडको ऑफ महाराष्ट्र लिमिटेड य्यांने लागू केलेल्या गावठाण विस्तार 12.5 टक्के योजनेअंतर्गत सिडको संचिका/फाईल क्र.ओवे-634 मधील भुखंड क्रमांकः-25, सेक्टर-33, क्षेत्रफळ 149.86 (150) चौ. मी., मौजे खारघर (ओवे), ता. पनवेल, जि. रायगड, हया भुखंडाचे त्यांच्या यांच्या मालकी हक्कातील संपादित करण्यात आलेल्या भुमी ऐवजी अंतिम वाटप करण्यात आले असून सदर भुखंड दिनांकः14/03/2012 रोजीच्या संगणकीय सोडतीनुसार वाटप केले आणि मे. सिडकोमार्फत त्यांच्या लाभांत सदरहु भुखंडासंदर्भातील भाडेपट्टा करारनामा हा दिनांकः28/08/2024, रोजी निष्पादित करुन सहदुयम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयामध्ये दस्तऐवज अनु.क्र.पवल-2/17453/2024 दिनांकः30/08/2024 रोजी नोंदणी करण्यात आला असून सदरचा भुखंड हा भुखंड मालक/धारक यांनी सिडकोची पुर्व परवानगी घेऊन हस्तांतरित करण्याचे ठरविले आहे. तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, खाली उल्लेखित भुखंडाचे आमचे अषिल श्री. मनिष कुमार जैन आणि श्रीमती. नीरू मनिष जैन यांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्यासंदर्भातील सिडकोमार्फत हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर त्या क्षेत्रासंदर्भात आमचे अषिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवष्यक आहे, उपरोक्त भुखंडावर अन्य्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेष, एल्एल्पी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झ्ााल्य्यापासून पंधरा (15) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवष्यक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अषिल सदरहु भुखंडासंदर्भातील सिडकोची पूर्व परवानगी घेऊन व्यवहार पूर्ण करतील य्याची नोंद घ्यावी, कळावे,

भुखंड/मिळकतीचे वर्णन

भुखंड क्रमांकः 25, सेक्टर-33, क्षेत्रफळ 149.86 (150) चौ. मी., मौजे खारघर (ओवे), तालुका पनवेल, जिल्हा रायगड
मिळकतीच्या चर्तु : सिमा खालील प्रमाणेः-

उत्तरेस	:	9.00 मीटर रूंद रस्ता
दक्षिणेस	:	भुखंड क्रमांकः 26
पुर्वेस	:	भुखंड क्रमांकः 24
पश्चिमेस	:	9.00 मीटर रूंद रस्ता

सहीः अजीत सिंह ॲण्ड असोसिएटस्
(वकील व कायदेषीर सल्लागार)
पत्ताः 17, 1 मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. 44, सेक्टर-11, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे.
फोन नं. 022 - 40026142
E-Mail ID : ajeet_advocate@yahoo.co.in

मनाची अस्वस्थता संवादान दूर होऊ शकते आणि सकारात्मक काही घडू शकत : डॉ. अच्युत गोडबोले

विद्या निकम यांच्या अस्वस्थ मनाची पडघम पुस्तकाचे प्रकाशन

मुंबई (वाशी समाचार)

माणसाचं मन हे फार चंचल असते. जन्मल्यापासूनच त्याला प्रत्येक गोष्टीचं कुतूहल असते. मन चिंती ते वैरी न चिंती असं म्हणतात कारण विचार करणं हे कित्येकदा त्याच्या हाताबाहेर गेलेले असते. असंख्य विचारांनी आपले मन कायम गुंतलेले असते. एखाद्या घराची खिडकी किंचित उघडी असेल तर त्या डोकावून पाहण्याचा मोह भल्याभल्यांना होतो त्यामुळेच आत्मचरित्राचा वाचक वर्ग खूप मोठा आहे. दुसऱ्याच्या आयुष्यात काय चालले आहे हे पाहणे जर इतकी स्वभाविक वृती असेल तर माणूस समोर असता त्याच्याशी संवाद करणे हेही तितकेच स्वाभाविक आहे. जिथे आपल्याच माणसाच्या मनाचा थांग आपल्याला लागत नाही तिथे दुसऱ्याच्या मनात डोकावून बघणे अधिकच कठीण बाब होऊन बसते. दुसऱ्याच्या मनाचा कप्पा किंचित किलकिला करणे साध्य होतेच असं नाही. मनाची अस्वस्थता मग ती आपली असो व इतर कुणाची, वैयक्तिक कारणाने असो वा आणखी कुठल्याही, ती संवादान दूर होऊ शकते आणि सकारात्मक काही घडू शकतं असा सूर विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम' ह्या सार्थ शीर्षक असलेल्या ललित लेखसंग्रहात मांडले आहे. विद्या निकम ही प्रतिभेचा तिसरा डोळा लाभलेली लेखिका असून तिने तिच्या अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे, आलेल्या अनुभवांचे, सूक्ष्म निरीक्षण करून - सोप्या रसाळ लेखन शैलीचा कोलाज या ललित लेख संग्रहातून मांडला आहे असे गौरवोदगार अच्युत गोडबोले यांनी काढले . श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान आणि अष्टगंध प्रकाशन यांच्या सयुक्त विद्यामाने दादर पूर्व येथील मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय सुरेंद्र गावस्कर सभागृहात विद्या निकम यांच्या 'अस्वस्थ मनाचे पडघम 'या ललित लेखसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी सुप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांनी आपले विचार मांडले. ज्येष्ठ नाटककार प्रेमानंद गज्वी, सिने नाट्य दिग्दर्शक कुमार सोहनी आणि महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळाच्या सचिव, कवयीत्री डॉ. मीनाक्षी पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सीआयआय इंडियन ग्रीन बिल्डिंग काउन्सिलचे (आईजीबीसी) नवी मुंबईत 30वे चैप्टर सुरू

मुंबई (वाशी समाचार)

नवी मुंबईमध्ये 120 हून जास्त ग्रीन बिल्डिंग प्रकल्प असून, ज्यात 610 दशलक्ष चौरस फूट क्षेत्र आहे. या प्रचंड शहरीकरणाला आणि त्याच्या वाणिज्यिक व निवासी रिअल इस्टेट विकासाला टिकाऊ आणि पर्यावरणपूरक मार्गावर ठेवण्यासाठी आईजीबीसी चा पुढचा चैप्टर नवी मुंबईत सुरू करण्यात आला आहे.

नवी मुंबई (वाशी समाचार) : सीआयआय-आईजीबीसी, भारतातील प्रमुख ग्रीन बिल्डिंग प्रमाणपत्र संस्था आणि संबंधित सेवांसाठी प्रसिद्ध असलेल्या संस्थेने मुंबईत आपला 30वा चैप्टर सुरू केला आहे. सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका सोमनाथ केकाण, यांच्या हस्ते या चैप्टरचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी एनएमएमसीचे वरिष्ठ अधिकारी, सीआयआय-आईजीबीसीचे प्रमुख पदाधिकारी, तसेच नवीं मुंबईतील प्रमुख बांधकाम व्यावसायिक, विकासकर्ता आणि आर्किटेक्ट्स उपस्थित होते.

आर्किटेक्ट हितेन सेठी, हितेन सेठी अँड असोसिएट्सचे प्रधान आर्किटेक्ट, हे या चैप्टरचे अध्यक्ष आहेत, तर अशोक छाजेर, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, अरिहंत सुपरस्ट्रक्चर्स लिमिटेड, यातील सह-अध्यक्ष आहेत.

आईजीबीसी आपले चैप्टर्स हे स्थानिक भागधारकांना सहभागी करण्यासाठी, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि शहराच्या टिकाऊपणासाठी आणि राष्ट्रीय उद्दिष्टांशी सुसंगत हरित उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करते.

नेट झिरो एनर्जी, वॉटर, वेस्ट आणि कार्बन रेटिंग प्रणाली नवी मुंबईतील बांधकाम क्षेत्रासाठी नेट झिरो पद्धतींचा अवलंब करण्याची मोठी संधी उपलब्ध करून देतात आणि 2070 पर्यंत नेट झिरो साध्य करणाऱ्या आघाडीच्या देशांपैकी भारताचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी योगदान देतील.

'स्वच्छता ही सेवा' अभियानात 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाव्दारे 300 हून अधिक देशी झाडांचे वृक्षारोपण

नवी मुंबई (वाशी समाचार) :

सुप्रसिध्द गायक विराग वानखेडे आणि मधुमालती यांच्या 'मिशन सेव्ह मदर अर्थ' शिर्षकांतर्गत नवी मुंबई (महाराष्ट्र) ते नाकोडाजी (राजस्थान) पर्यंतच्या 1000 किमी. हून अधिक अंतर चालत जाऊन वृक्षारोपणासह 'ग्रीन वॉकेथॉन' उपक्रमाचा प्रारंभ संपन्न झाला. आ. गणेश नाईक आणि आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह सर्व उपस्थितांनी या पर्यावरणशील उपक्रमाचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रापासून राजस्थानपर्यंत चालत जाऊन जागोजागी 1 लाख वृक्षलागवड करण्याचा त्यांचा संकल्प यशस्वी होईल असा विश्वास सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या 'स्वच्छ भारत मिशन'च्या वतीने प्राप्त निर्देशानुसार 14 सप्टेंबर ते 1 ऑक्टोबर 2024 या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा (SHS) पंधरवडा' साजरा करण्यात येत असून या अंतर्गत 'स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता' अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून त्यामधील 'एक पेड माँ के नाम' हा एक अभिनव उपक्रम सेक्टर 36, नेरूळ येथील गणपतशेठ तांडेल मैदानाजवळील उद्यानात संपन्न झाला.

याप्रसंगी विधानसभा सदस्य आ. गणेश नाईक, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, माजी आमदार संदीप नाईक, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, उद्यान विभागाचे उपआयुक्त दिलीप नेरकर, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ 1 उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ 2 उपआयुक्त डॉ. संतोष वारूळे, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे, नेरूळ विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे, बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, माजी नगरसेवक रविंद्र इथापे, स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या वुमेन आयकॉन रिचा समित आणि इतर उपस्थितांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे या उपक्रमात लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या सहयोगातून 167 तृतीयपंथी नागरिकांनी उत्साहाने सहभागी होत वृक्षारोपण केले.

आपल्या वडिलधा-यांच्या सन्मानार्थ झाड लावण्याची आपली परंपरा आहे, त्यानुसार मा.पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविला जात असल्याचा आनंद व्यक्त करीत आ.गणेश नाईक यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, स्वच्छता अशा विविध क्षेत्रांप्रमाणेच वृक्षारोपणातून पर्यावरणासाठीही लौकिकाला साजेसे काम होत असल्याबद्दल आयुक्त व सर्व सहकारी, अधिकारी यांचे कौतुक केले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी वातावरणातील बदलामुळे होणारे परिणाम थांबविण्याकरिता सध्याचे जागतिक तापमान वाढीचे प्रमाण लक्षात घेऊन सर्वांनी जागरूक होण्याची गरज असल्याचे स्पष्ट करीत वैयक्तिक, संस्थात्मक व सामाजिक अशा तिन्ही पातळ्यांवर प्रत्येक नागरिकाने आपली पर्यावरण संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी पार पाडणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. शहरात पशूपक्ष्यांचा अधिवास वाढेल अशा 300 हून अधिक देशी वृक्षरोपांची यावेळी लागवड करण्यात आली. ज्यामध्ये जांभूळ, वड, पिंपळ, आंबा, फणस, मोहोगणी, आवळा, पेरू, चिक्कू, सीताफळ, करंज, अर्जुन, बकुळ, सीता, अशोक, काजू, आंबा, वड, पिंपळ, करंज आदी वृक्षारोपण करण्यात आले.

कोपरखैरणे तीन टाकी येथे महाराष्ट्र कर्मचारी युनियनच्या नामफलकाचे उद्घाटन उत्साहात संपन्न

कोपरखैरणे (वाशी समाचार)

कोपरखैरणे तीन टाकी येथे शुक्रवारी कामगार नेते रविंद्र सावंत यांच्या हस्ते महाराष्ट्र कर्मचारी युनियनच्या नामफलकाचे उद्घाटन उत्साहात पार पाडले. महाराष्ट्र कर्मचारी युनियनने नवी मुंबई महापालिकेत अधिकारी व सर्व कामगार यांना एकत्रित करून गेली नऊ वर्ष सातत्याने ठोक मानधन व कंत्राटी कामगारांच्या हितासंदर्भात महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करत कामगारांचे प्रश्न सातत्याने प्रशासनापुढे व अधिकाऱ्यांसमवेत मांडण्याचे काम केले आहे.

लेखी निवेदनातून तसेच शिष्टमंडळासमवेत महापालिका ते मंत्रालयदरबारी सातत्याने पाठपुरावाही केला आहे. युनियनच्या माध्यमातून प्रशासनदरबारी कामगारांचे अनेक प्रश्न सोडवण्यात आलेले आहेत. अनेक कामगारांना तसेच अधिकाऱ्यांना न्यायही युनियनने मिळवून दिलेला आहे. महाराष्ट्र कर्मचारी युनियन ही कामगार संघटना नवी मुंबई महापालिकेत सर्वात मोठी संघटना असून या संघटनेकडे सभासद संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अशा या संघटनेने सतत कर्मचारी अधिकाऱ्यांच्या समस्या सोडवल्यामुळे मोठ्या प्रमाणात महापालिकेतील कामगार येऊन सभासद होताना दिसत आहेत. कामगारांचे हित हेच संघटनेचे धोरण या उक्तीप्रमाणे कामगार नेते रवींद्र सावंत यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र कर्मचारी युनियन मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

यावेळी महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे सचिव मंगेश गायकवाड, महापालिका कंत्राटी विभाग अध्यक्ष संजय सुतार,परिवहन विभाग अध्यक्ष नितीन गायकवाड, घनकचरा व्यवस्थापन अध्यक्ष रविकुमार राठोड, कांतीलाल चांदणे, जितेश तांडेल,सुशांत लंबे,कंत्राटी कामगार विभागाचे उपाध्यक्ष राजेंद्र जाधव. कोपरखैरणे विभाग कमिटीचे अध्यक्ष राजेश बंगेरा, उपाध्यक्ष नितीन बांगर, उपाध्यक्ष सुयेश मोरे, उपाध्यक्ष दुर्गेश कोळी, उपाध्यक्ष विशाल पाटील, सचिव संभाजी सोनकांबळे, सदस्य रवि दिवेकर, सचिन चिंचोलकर, गणेश गायकवाड, बादल म्हात्रे, राजेश भालेराव, महेश पाटील वामन डाऊरकर, विशाल मुकादम, जीवन खराटकर, दिनेश घरत, रोनित नाईक, रमेश जयपाल, दिलीप नाईक, दत्ताराम म्हात्रे, साईनाथ गायकवाड, प्रभुदयाळ खरात, चंद्रकांत सोनकांबळे, श्रीधर कांबळे, निलेश वातास यांच्यासह विविध विभागातील कर्मचारीचे संघटनेचे युनिट सभासद / पदाधिकारी तसेच पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग, परिवहन विभाग, मलनिःसारण विभाग, घनकचरा विभाग,आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी सभासद/पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खान्देश मेळावा नवी मुंबईत मोठया उत्साहात संपन्न

नवी मुंबई (वाशी समाचार)

खान्देशमधील नवी मुंबई, मुंबई, ठाणे व रायगड या क्षेत्रातली खान्देशवासीयांच्या विविध १८ मंडळांच्या सहकार्याने शिवकमल सेवा संस्था, नवी मुंबई संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बाविस्कर यांच्या पुढाकारणने नवी मुंबईतील जुईनगर येथील बंट हॉल मध्ये शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या प्रमुख उपस्थितीत खान्देश मेळावा संपन्न झाला.

यावेळी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी सांगितले की, स्पर्धेच्या युगात आपली काम करायची असल्यास राजकारणात आणि प्रशासनात आपली माणस असणे महत्वाचे असते. खान्देश भवन नवी मुंबई शहरात निर्माण व्हावे अशी मागणी सर्वांचीच असून भवनसाठी नवी मुंबईत जागा मिळवून देण्यासाठी सिडको आणि राज्य शासनाकडे आपण त्वरित प्रस्ताव द्यावा, मी पाठपुरावा करून लगेच जागा मंजूर करून घेतो.

प्रारभी, प्रस्थावनेत शिवकमल सेवा संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बाविस्कर यांनी खान्देशातील तरुणांच्या बेरोजगारी, कांदा, केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. खान्देशवासियांनी पक्षीय मतभेत बाजुला ठेऊन सर्वांगीन विकासासाठी एकसंघ रहावे असे आवाहन केले. यावेळी खान्देशचे सुपुत्र उपनेते विजय नाहटा, माजी पोलीस महानिरीक्षक प्रतापराव दिघावकर, आयएएस अक्षय अग्रवाल, आयआरएस उज्वलकुमार चव्हाण, संजय निकम, नंदू वाघ आदिचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भिमराव पाटील, देवीसिंग राजपूत, कुंदन महाजन, ज्योतीकुमार गुजराथी, भारत थोरात, योगेश पाटील, यांनी मेहनत घेतली. कार्यकमाचे सूत्रसंचालन निमिषा बाविस्कर, वैदेही पाटील, पायल भोईटे-चव्हाण यांनी केले. या मेळाव्यास खान्देशातील सुमारे १००० लोकांनी उपस्थिती लावली होती.

नवी मुंबईमधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेली बांधकामे नियमित होण्याचा मार्ग मोकळा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर नगरविकास विभागात स्थानिक भूमिपुत्र आणि सिडको अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक

मुंबई (वाशी समाचार)

नवी मुंबईमधील प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेली बांधकामे नियमित करण्यासाठी दोन वर्षांपूर्वी शासन आदेश निघुनही अडचणी येत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याची दखल घेत तात्काळ बैठक घेण्याचे आदेश दिले होते. दि. ११ सप्टेंबर रोजी खासदार नरेश म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली नगरविकास विभागात सिडको अधिकारी आणिस्थानिक भूमिपुत्रयांचीसंयुक्त बैठक होऊन चर्चा झाली. अंतिम मसुदा आता लवकरच मुख्यमंत्र्यांकडे सादर केला जाणार असल्याने ही बांधकामे नियमित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातील पनवेल व उरण या तालुक्यांमधील अनेक गावांमधील भूमिपुत्रांनी गरजेपोटी रहिवास प्रयोजनार्थ बांधकामे केली आहेत. मात्र ही बांधकामे अनधिकृत म्हणून गणली जात आहेत. ही बांधकामे नियमित करण्यासंदर्भात 25 फेब्रुवारी 2022 आणि 7 डिसेंबर 2022 रोजी राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला होता. दोन वर्ष झाले तरी निर्णयाची अंमलबजावणी करतांना अनेक अडचणी सिडको प्रशासन आणि भूमिपुत्रांना येत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्पग्रस्तांनी यासंदर्भात राज्य शासन, सिडको यांना अनेक निवेदने, अर्ज, सूचना केल्या आहेत. तसेच शासनानेही सिडको प्रशासनाला स्वयंस्पष्ट प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना वेळोवेळी केल्या आहेत. खासदार नरेश म्हस्के यांनी सुध्दा लोकसभा निवडणुकीतील प्रचारा दरम्यान प्राधान्याने हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन प्रकल्पग्रस्तांना दिले होते.

प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशान्वये आज नगरविकास विभागात नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असिम गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली एका बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीला खासदार नरेश म्हस्के, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, शिवसेना उपनेते विजय नाहटा, शिवसेना जिल्हाप्रमुख विजय चौगुले, माजी नगरसेवक शिवराम पाटील, किशोर पाटकर, स्थानिक शिवसैनिक आणि भूमिपुत्र उपस्थित होते. बैठकीत बांधकामे नियमित करण्यासंदर्भातील धोरणाबाबत चर्चा करण्यात आली. काही सूचना करण्यात आल्या. स्थानिक भूमिपुत्रांना कोणताही त्रास न होता बांधकामे नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येणार आहे. हा प्रस्ताव तात्काळ मुख्यमंत्र्यांकडे अंतिम मंजुरी पाठविण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. गेली अनेक वर्ष प्रकल्पग्रस्तांचा हा प्रश्न प्रलंबित होता. आता लवकरच शासन आदेश निघुन बांधकामे नियमित होतील, असा विश्वास खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केला आहे.

रक्तदाब नियंत्रित करणारी 'रेनल डिनरव्हेशन' उपचार पद्धती

नवी मुंबई (वाशी समाचार)

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. ब्रजेश कुंवर यांनी नवी मुंबईतील अशा प्रकारची पहिलीच तीव्रता कमीत कमी असलेली शस्त्रक्रिया केली. जेव्हा ४२ वर्षीय रुग्णामध्ये धोकादायक पद्धतीने वाढलेला उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यात नियमित उपचार अयशस्वी ठरली, तेव्हा डॉ. ब्रजेश कुमार कुंवर रेनल डिनर व्हेशन या एका अभिनव उपचाराकडे वळले. हे उपचार म्हणजे हायपरटेन्शन (एचटी) व्यवस्थापनामध्ये झालेली लक्षणीय प्रगती. रायगड, उरण येथे राहणारे चेतन वाझेकर हे मनमुराद भटकंती करणारे आणि साहसी बायकर्स उत्साही पर्यटक. विविध प्रकारची अँटीहाइपरटेन्सिव्ह औषधे घेत असूनही अनियंत्रित राहत असलेल्या उच्च रक्तदाबाच्या विकाराचा म्हणजे रेझिस्टंट हायपरटेन्शन (एचटी) विरुद्ध ते झुंज देत होते. सक्रिय, कार्यमग्न जीवनशैली असूनही त्यांचा रक्तदाब धोकादायकरित्या उच्चच राहत होता. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, पक्षाघात, मूत्रपिंड निकामी होण्याचा धोका वाढत होता. या गोष्टीचा त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकत होता.

रेनल डीनर्व्हेशन ही एक नवीन तीव्रता कमी असलेली उपचार प्रक्रिया असून रेझिस्टंट (प्रतिरोधक) एचटी व्यवस्थापित करण्यासाठी वापरली जाते. रेझिस्टंट एचटी म्हणजे सर्वसाधारणपणे केल्या जाणाऱ्या उपचारांना चांगला प्रतिसाद न देणारा उच्च रक्तदाब. रिनल म्हणजे मूत्रपिंड साठीच्या धमन्यांच्या सभोवतालच्या मज्जातंतूला रेडिओ फ्रिक्वेंसी पृथक्करण वितरीत करण्यासाठी कॅथेटर वापरल्याने, उच्च रक्तदाबासाठी कारणीभूत ठरणाऱ्या नसा विस्कळीत होतात. मज्जासंस्थेच्या क्रियांमधील ही घट रक्तदाब कमी करण्यास मदत करते आणि बहुविध औषधांची आवश्यकता कमी करू शकते. चेतन वाझेकर, पेशंट,

उच्च रक्तदाब विकारग्रस्त म्हणाले,"या उपचारांपूर्वी माझ्या उच्च रक्तदाबामुळे दैनंदिन कामे करणे देखील मला कठीण झाले होते. माझ्या तब्येतीची मला सदैव काळजी वाटत होती. डॉ. कुंवर आणि अपोलो हॉस्पिटलमधील टीमचे मी आभार मानतो. त्यांच्यामुळे मला नवजीवन मिळाल्यासारखेच वाटत आहे. माझा रक्तदाब नियंत्रणात आहे आणि आता सतत मला कधी काय होईल याची चिंता करत बसण्याऐवजी मला छान, स्वास्थ्यपूर्ण वाटत आहे. आता परत एकदा आयुष्याची घोडदौड सुरू करायला आणि स्वतःच्या तब्बेतीची काळजी करत न बसता नवनवीन शिखरांवर विजय मिळवण्यास मी खूप उत्सुक आहे." डॉ. ब्रजेश कुमार कुंवर, वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट, अपोलो हॉस्पिटल्स, नवी मुंबई यांनी सांगितले,"उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांमध्ये रेझिस्टंट एचटीचे प्रमाण 10% ते 20% पर्यंत असते. अवघे ४२ वर्षांच्या तरुण वयात अनियंत्रित एचटीचे निदान झालेल्या रुग्णावर या स्थितीचे गंभीर परिणाम होऊ शकतात. हा रुग्ण सक्रिय जीवनशैली असलेला आणि खूप उत्साही आहे. अशा व्यक्तीला आपण जर वेळेवर वैद्यकीय उपचार मदत करू शकलो नाही तर ते फारच दुःखद ठरू शकते. रक्तदाब प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यासाठी आणि दीर्घकाळ औषधावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रेनल डीनर्व्हेशन ही एक आश्वासक उपचार पद्धती ठरली."

अमन सेहरावत यांनी असित कुमार मोदी यांच्यासमवेत

गणपतीची आरती करुन उत्सवाची सुरुवात

मुंबई (वाशी समाचार)

गणेश चतुर्थीच्या भव्य सोहळ्यात, तारक मेहता का उल्टा चष्माचे आवडते ठिकाण असलेल्या गोकुळधाम सोसायटीने पुन्हा एकदा सणाची भावना आणि सांस्कृतिक एकात्मतेबद्दल आपली बांधिलकी दाखवली आहे. समाजाने गणेशमूर्तीची सुंदर प्रतिष्ठापना केली आहे, त्यामुळे उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. प्रसिद्ध टेलिव्हिजन शोचे निर्माते असित कुमार मोदी, भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू आणि पॅरिस ऑलिम्पिक पदक विजेते अमन सेहरावत यांच्या समवेत आकस्मिक आगमनाने यंदाचा उत्सव आणखी वाढला. गोकुळधामच्या रहिवाशांनी या दोघांचेही मनापासून स्वागत केले आणि या सोहळ्याला विशेष आकर्षण निर्माण केले. आपला आनंद व्यक्त करताना, तारक मेहता का उल्टा चष्माचे निर्माते असित कुमार मोदी म्हणाले, "मी त्या वेळी अमेरिकेत असतानाही ते तारक मेहता का उल्टा चष्मा पाहत असल्याचे सांगितले तेव्हा मला खूप आनंद झाला. पण मला वाटले की त्याला शोमध्ये आमंत्रित करणे आणि त्याला आमच्या प्रतिभावान कलाकारांना भेटायला लावणे ही खूप आनंदाची गोष्ट आहे समर्थन आणि ओळख, आणि लोकांच्या चेहऱ्यावर हसू आणत राहील.

" भारतीय व्यावसायिक कुस्तीपटू आणि पॅरिस ऑलिम्पिक पदक विजेता अमन सेहरावत यांनी कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले, "या उत्सवाचा भाग बनण्याची आणि तारक मेहता का उल्टा चष्माच्या कलाकारांना भेटण्याची संधी मिळाल्याबद्दल मी अत्यंत आभारी आहे. हा कार्यक्रम पाहून मला आनंद आणि शांती मिळाली आहे. विशेषत: कठीण काळात, समर्थनाचा स्रोत आहे. ऑलिम्पिक कांस्यपदक जिंकणे ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी होती, आणि जरी मी सुरुवातीला सुवर्णपदक जिंकले नाही म्हणून निराश झालो होतो, तरीही मी आता मला येथे आणलेल्या आशीर्वाद आणि समर्थनाची प्रशंसा करतो.

मेडिकवर हॉस्पिटलमध्ये केमो डे केअर वॉर्ड सुरु

मुख्यमंत्री वैदयकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या उपस्थितीत शुभारंभ संपन्न

खारघर (वाशी समाचार)

कॅन्सरशी लढा देणाऱ्यांसाठी तसेच केमोथेरपी घेत असलेल्या रुग्णांसाठी नवी मुंबईच्या खारघर येथील मेडिकवर हॉस्पिटल्सने सुरक्षित आणि उत्तम दर्जाच्या सुविधा देण्यासाठी केमो डे केअर वॉर्ड सुरू केला आहे. या नवीन सुविधेमध्ये एकाच वेळी 15 रुग्ण केमोथेरपी उपचार घेऊ शकतात आणि त्यात अत्याधुनिक उपकरणांचा समावेश आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली याठिकाणी उपचार दिले जाणार आहेत. मुख्यमंत्री वैद्यकिय सहायता निधी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते या प्रभागाचे उद्घाटन करण्यात आले.

केमोथेरपी हा कर्करोगाच्या उपचाराचा आधारस्तंभ आहे. बहुसंख्य रूग्णांसाठी, हॉस्पिटलमध्ये केमोथेरपी घेणे आणि त्यानंतर घरी परतणे हा प्रवास खूप त्रासदायक ठरतो.

या प्रक्रियेमुळे त्यांना अनेकदा थकल्यासारखे वाटते. म्हणूनच, नवी मुंबईतील मेडिकवर हॉस्पिटल्सने रुग्णांना केमोथेरपी उपचार घेण्यासाठी आणि त्याच दिवशी घरी परतण्यासाठी केमो डे केअर वॉर्डची स्थापना करण्याचा एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे.

मेडिकवर हॉस्पिटल्सच्या माध्यमातून हे आतापर्यंत कर्करुग्णांना आजतगायत उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा प्रदान करण्यात आल्या आहेत. उपचार घेत असलेल्या रुग्णांचे आरोग्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी रुग्णालयाने आता आणखी एक पाऊल पुढे टाकत केमो डे केअर वॉर्ड सुरू केला आहे. रूग्णालयाने घेतलेल्या प्रयत्नांमुळे कर्करोगाच्या रूग्णावर उच्च दर्जाचे व यशस्वी उपचार केले जातील अशी प्रतिक्रिया मंगेश चिवटे यांनी यावेळी व्यक्त केली. याठिकाणी थेरेपी घेणाऱ्या सर्व कर्करुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत तर कर्करोगासंबंधीत शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना १ लाख रुपयांची आर्थिक मदत करणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली आली.

अवयव प्रत्यारोपणासारख्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून २ लाख रुपयांची मदत केली जाणार असल्याची प्रतिक्रिया श्री चिवटे यांनी व्यक्त केली. नवीन डे केअर वॉर्ड हे कर्करोगाच्या रूग्णांसाठी उपचार पद्धती बदलत आहे. हा वॉर्ड रुग्णांसाठी सोयी आणि आराम या दोन्ही गोष्टींना प्राधान्य देतो. केमोथेरेपी घेतल्यानंतर त्याच दिवशी ते घरी जाऊ शकतात हे रुग्णांना दिलासा देणारे आहे. वॉर्ड रुग्णांना आणि त्यांच्या प्रियजनांना केमोथेरपी-संबंधित दुष्परिणामांना प्रतिबंध आणि व्यवस्थापनाबाबत शिक्षित करेल. हॉस्पिटलमध्ये केमोथेरपी घेत असलेल्या आणि प्रमाणापेक्षा जास्त केस गळत असणाऱ्या रुग्णांना केमो कॅप्स दिल्या जातील अशी प्रतिक्रिया डॉ डोनाल्ड जॉन बाबू (सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट, मेडिकवर हॉस्पिटल, नवी मुंबई) यांनी व्यक्त केली.

मेडिकवर हॉस्पिटलचे प्रयत्न हे केवळ रोगावर उपचार करण्यासाठीच नव्हे तर,या आव्हानात्मक काळात रुग्णांना होणारा त्रास, त्यांची गैरसोय कमी करण्याचा देखील प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. माताप्रसाद गुप्ता (मेडिकवर हॉस्पिटल्सचे, केंद्र प्रमुख) यांनी सांगितले.

Rotaract Club of DY Patil University Hosts "Super Strikers 3.0" Football Tournament

The Rotaract Club of DY Patil Deemed to be University School of Management recently hosted a thrilling football tournament 'Super Strikers 3.0' which eclipsed the excitement of its previous editions.

